ePaper

# 22 मार्चला कर्नाटक बंदचे आवाहन, महाराष्ट्राशी आहे कनेक्शन

| वर्ष - 8 | अंक - 240 | UDYAM-MH-26-0158827 |




महाईन्यूज(TM)

**आजच्या 'स्टेट'मेंट मध्ये वाचा..**



प्रत्येक मुस्लिम दहशतवादी नाही : पण, प्रत्येक दहशतवादी मुस्लिम कसा काय?

पान 4 वर

www.mahaenews.com | बुधवार, दि. 19 मार्च 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## सिमेंटच्या विटांचा जीवघेणा मारा ; एवढे दगड आले कुठून ?

# नागपूर दंगलीचा 'आँखो देखा हाल !'

## हल्ला 'WELL PLANNED' ; 'TARGET' हिंदू आणि पोलीस खाते !



। नागपूर / मुंबई । विशेष प्रतिनिधी । महाईन्यूज

**नागपूरमध्ये पेटलेली दंगल ही अचानक पेटली नव्हती; तर ते 'पूर्वनियोजित' असे कारस्थान होते, असा खुलासा पोलीस खात्यानेच केला आहे. पोलीस खात्याच्या अधिकाऱ्यांनी याबाबत पत्रकारांशी बोलताना 'आँखो देखा हाल' सादर केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे नागपूर हे शहर खरे तर अत्यंत शांतताप्रिय शहर म्हणून ओळखले जाते. पण, दंगल भडकवणाऱ्यांनी एकाच दगडात अनेक पक्षी मारण्याचे सुनियोजित कारस्थान रचले.**





नागपूरमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय असून त्यांचा दंगलीत सहभाग असल्याचा आरोप करायचा, फडणवीस यांचे गृहखाते कुचकामी आहे आणि ते स्वतःचे शहर दंगलीपासून दूर ठेवू शकत नाहीत, तर राज्य काय वाचवणार? असा राज्यातील जनतेला संदेश द्यायचा, हा या दंगलीमागचा हेतू असावा, हे आता स्पष्ट होत आहे.

### पोलीस उपायुक्त आर्चित चांडक म्हणतात..

दोन गटांमध्ये घोषणाबाजी आणि प्रचंड राडा झाल्यानंतरही होत असलेली प्रचंड दगडफेक रोखण्यासाठी मी पुढे सरसावलो. सुरुवातीला दगडांमुळे पायाला जखम झाली. मात्र, परिस्थिती फारच बिकट असल्याने आणि हिंसक जमाव नियंत्रणात आणणे महत्त्वाचे असल्याने माझे जखमेकडे लक्ष नव्हते. परंतु, जेव्हा आम्ही परिस्थिती नियंत्रणात आणण्यात यश मिळविले, त्यानंतर थोड्या वेळाने मला झालेल्या जखमेतून वेदना होऊ लागल्याचे पोलिस उपायुक्त अर्चित चांडक म्हणाले. आपल्याला डॉक्टरांनी तपासल्यानंतर शस्त्रक्रियेची काहीही गरज नसल्याचे म्हटले आहे.मात्र, पाय फ्रॅक्चर झाला असून डॉक्टरांनी आराम करण्यास सांगितले आहे.

याप्रकरणी आत्तापर्यंत ५० जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

### नागपूर पोलिसांनी सांगितला घटनाक्रम..

नागपूरच्या पोलीस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, नागपूरमधील महाल या मध्यवर्ती भागात सोमवारी औरंगजेबाच्या कबरीवरून वाद चिघळला. दोन गटांमध्ये मोठी दंगल देखील झाली, इतकेच नाही, तर पोलिसांवर थेट दगडांचा पाऊस पडल्याचे पाहायला मिळाले. अनेक पोलीस कर्मचारी यामध्ये जखमी झाले आहेत.

### दगडांचा खच; मारा थांबेना!

दोन्ही गट एकमेकांसमोर आले आणि हिंसक बनत चालले. त्यांच्याकडून होणारा दगडांचा मारा थांबतच नव्हता. त्यामुळे हे दगड नेमके कुठून येत होते? हा हल्ला पूर्वनियोजित तर नव्हता ना ? असे सवाल निर्माण होत आहेत, असे प्रश्न पोलिसांनीच उपस्थित केले आहेत.

### सूर्यास्तानंतर शहर धुरांनी वेढले..

नागपूर शहर सूर्यास्तानंतर दगडफेक आणि जेसीबी वाहनांच्या धुराने अचानक वेढले गेले. दोन्ही बाजूंच्या जमावाकडून कानठळ्या बसवणारी घोषणाबाजी आणि दगड - विटांचा जीवघेणा मारा सुरु होता. या हल्ल्यात तीसहून अधिक पोलीस गंभीर जखमी झाले. या हल्ल्याला पार्श्वभूमी सोमवारी निघालेल्या मोर्चाची मागणी औरंग्याची कबर हटविण्याची होती.असा खुलासाही पोलिसांनी केला आहे.

### मीडियावर पसरलेल्या अफवेमुळे.

महाल परिसरातील दोन गटात मोर्चानंतर अफवा पसरली. ती अफवा काय होती हे सांगण्यास पोलिसांनी मात्र नकार दिला. त्यानंतर दोन गटात भयंकर राडा झाला. दगडांच्या आणि सिमेंटच्या विटांच्या माऱ्यामुळे अनेक पोलीस जखमी झाले. तर एका समाजकंटकाच्या कुऱ्हाडीचा घाव हातावर झेलत डीसीपी निकेतन कदम यांनी आपल्या सहकाऱ्यांना वाचवले. आमच्याकडे सर्व सीसीटीव्ही फुटेज असून त्याआधारे आम्ही समाजकंटकांना शोधून काढू, असे देखील निकेतन कदम यांनी स्पष्ट केले आहे.

### हल्ला पूर्वनियोजित असू शकतो..

पोलीस उपायुक्त आर्चित चांडक यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, शक्यता नाकारता येत नाही. पण, हल्ला ठरवून देखील केलेला असू शकतो. घटनास्थळी बांधकाम सुरू होते. त्यातील सिमेंटच्या विटा हल्लेखोरांनी पोलिसांवर फेकल्या. त्यामुळेच जास्त पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. आम्ही खाकी वर्दी घातली आहे, आमचे कर्तव्य कायदा- सुव्यवस्था राखणे हेच आहे. सर्वांनी शांतता ठेवावी आणि पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन चांडक यांनी केले आहे.

### अग्निशामक दल घटनास्थळी वेळेत दाखल

# नारायणगाव बाजारपेठेत भीषण आग!

## अग्निशामक दलाच्या जवानांनी कापड दुकानाची भिंत तोडली

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नारायणगाव येथील बाजार पेठेतील मुथ्था मार्केटमधील दुमजली अष्टविनायक रेडिमेड कापड दुकानाला भीषण आग लागली. मंगळवारी पहाटे पाच वाजता लागलेल्या या आगीची झळ शेजारील दुकानांनाही लागली. जुन्नर आणि राजगुरूनगर येथील अग्निशामक दलाचे बंब घटनास्थळी वेळेत दाखल झाल्याने मोठा अनर्थ टळला.**



नारायणगावमधील एसटी बसस्थानकाशेजारी मुख्य बाजारपेठेत नंदराम मुथ्था मार्केटमध्ये धवल सुरेश चव्हाण यांच्या मालकीचे दुमजली अष्टविनायक रेडिमेड कापड आहे. आग लागल्याची माहिती वैभव मुथ्था व रज्जाक काझी यांनी अग्निशमन दलाला दिली. आगीची माहिती कळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार, उपसरपंच योगेश पाटे ,विघ्नहर साखर कारखान्याचे चेअरमन सत्यशील शेरकर, जुन्नर तालुका औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष अमित बेनके घटनास्थळी दाखल झाले. विघ्नहर साखर कारखाना आणि राजे छत्रपती प्रतिष्ठानचे बंब, आकाश कानसकर यांचा खाजगी टँकर, कांदळी औद्योगिक वसाहतीचा बंब यांच्या सहाय्याने सुमारे ५ तासांच्या अथक प्रयत्नाने आग आटोक्यात आणण्यात आली. आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशामक दलाच्या जवानांनी कापड दुकानाची भिंत तोडली. जुन्नर अग्निशामक दलाचे जवान राजकुमार चव्हाण यांनी शिडीच्या मदतीने पहिल्या मजल्यावरील आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. या आगीची झळ अष्टविनायक रेडिमेड दुकानाशेजारील वऱ्हाडी मेडिकल दुकान, धांडे कलेक्शन या दुकानांनाही पोहोचली. त्यामध्ये त्यांचे नुकसान झाले. दुपारी एकच्या सुमारास आग आटोक्यात आली. जुन्नर आणि राजगुरूनगर येथील अग्निशामक दलाचे बंब घटनास्थळी वेळेत दाखल झाल्याने मोठा अनर्थ टळला.

विघ्नहर साखर कारखाना आणि राजे छत्रपती प्रतिष्ठानचे बंब, आकाश कानसकर यांचा खाजगी टँकर, कांदळी औद्योगिक वसाहतीचा बंब यांच्या सहाय्याने सुमारे ५ तासांच्या अथक प्रयत्नाने आग आटोक्यात आणण्यात आली.आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशामक दलाच्या जवानांनी कापड दुकानाची भिंत तोडली.

नारायणगाव येथील बाजार पेठेतील मुथ्था मार्केटमधील दुमजली अष्टविनायक रेडिमेड कापड दुकानाला भीषण आग लागली. मंगळवारी पहाटे पाच वाजता लागलेल्या या आगीची झळ शेजारील दुकानांनाही लागली. जुन्नर आणि राजगुरूनगर येथील अग्निशामक दलाचे बंब घटनास्थळी वेळेत दाखल झाल्याने मोठा अनर्थ टळला.

### आग आटोक्यात आणण्यात आली

नारायणगावमधील एसटी बसस्थानकाशेजारी मुख्य बाजारपेठेत नंदराम मुथ्था मार्केटमध्ये धवल सुरेश चव्हाण यांच्या मालकीचे दुमजली अष्टविनायक रेडिमेड कापड आहे. आग लागल्याची माहिती वैभव मुथ्था व रज्जाक काझी यांनी अग्निशमन दलाला दिली. आगीची माहिती कळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार, उपसरपंच योगेश पाटे ,विघ्नहर साखर कारखान्याचे चेअरमन सत्यशील शेरकर, जुन्नर तालुका औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष अमित बेनके घटनास्थळी दाखल झाले. विघ्नहर साखर कारखाना आणि राजे छत्रपती प्रतिष्ठानचे बंब, आकाश कानसकर यांचा खाजगी टँकर, कांदळी औद्योगिक वसाहतीचा बंब यांच्या सहाय्याने सुमारे ५ तासांच्या अथक प्रयत्नाने आग आटोक्यात आणण्यात आली.आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशामक दलाच्या जवानांनी कापड दुकानाची भिंत तोडली.

---

### तिसऱ्या-चौथ्या मार्गिकेसाठी जागेचे भूसंपादन करा!

## खासदार श्रीरंग बारणे : लोणावळा ते पुण्यापर्यंत मार्गिकेचे काम करावे

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे ते लोणावळा दरम्यानची तिसरी आणि चौथी मार्गिका जमीन अधिग्रहण न झाल्याने रखडली आहे. पनवेलमध्ये देशातील सर्वात मोठे विमानतळ होत आहे. त्यामुळे कर्जत ते लोणावळा आणि लोणावळा ते पुण्यापर्यंत तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेचे काम करावे. त्यामुळे पनवेल पासून थेट पुण्यापर्यंत जलद रेल्वे धावू शकतात. दुपारी दीड वाजता लोणावळावरून पुण्याला जाणारी लोकल पुन्हा सुरू करावी.**




अमृत भारत योजनेत कर्जत आणि नेरळ रेल्वे स्थानकाचा समावेश करण्याची मागणी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी लोकसभेत केली. खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, रेल्वेच्या आधुनिकीकरणासाठी अर्थसंकल्पात २.५२ लाख कोटी रुपये देण्यात आले आहेत. मागील काही अर्थसंकल्पाच्या तुलनेत चार पटीने जास्त हा निधी आहे. पुढील तीन वर्षात १०० अमृत भारत ट्रेन, ५० नमो भारत ट्रेन आणि २०० वंदे भारत ट्रेन तयार करण्यात येणार आहेत. या अर्थसंकल्पात महाराष्ट्रातील रेल्वे विस्तार, रेल्वे विकासासाठी महत्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.महाराष्ट्राला सर्वाधिक २३ हजार ७७८ कोटी रुपयांचा निधी दिला आहे. यामुळे राज्यातील रेल्वेला गती मिळेल. शत प्रतिशत रेल विद्युतीकरण प्राप्त करणारे महाराष्ट्र प्रमुख राज्य आहे. यामुळे विजेची बचत होते. पर्यावरणाचे संरक्षण होत आहे. २०१४ पासून आतापर्यंत २ हजार १०५ किलोमीटर नवीन रेल्वे मार्ग विकसित करण्यात आले आहेत. महाराष्ट्रातील १३२ रेल्वे स्थानकांचा अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत विकास केला जात आहे.मावळ लोकसभा मतदारसंघातील चिंचवड, आकुर्डी, तळेगाव दाभाडे, लोणावळा, पनवेल जंक्शनचा या योजनेअंतर्गत विकास केला जात आहे.

### जेणेकरून प्रवाशांना सुविधा मिळतील

कर्जत आणि नेरळ रेल्वे स्थानकाचा या योजनेत समावेश करावा. हा मार्ग मुंबईपासून पुण्यापर्यंत जातो. या मार्गावरून सर्वाधिक प्रवासी प्रवास करतात. त्यामुळे या योजनेत सहभागी करून घेऊन विकसित करावा. जेणेकरून प्रवाशांना सुविधा मिळतील. रेल्वे मार्गिकेच्या निर्माणासाठी ५० ते ६० टक्के किलोमीटर वाढवून १८३ किलोमीटर केले आहे.

## यंदाचा 57 कोटी 36 लाख 86 हजार रुपयांचा अर्थसंकल्प

# वृक्ष संवर्धन विभागाचे शिलकी अंदाजपत्रक मंजूर!

### आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांची मंजुरी

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वृक्षसंवर्धन विभागाचे आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या ५ कोटी ९ लाख रुपये शिल्लक रकमेसह आर्थिक वर्ष २०२५-२६ चे ५७ कोटी ३६ लाख ८६ हजार रुपयांचे सुधारित अंदाजपत्रक मंगळवारी स्थायी समिती व महापालिका सभेमध्ये सादर करण्यात आले. या अंदाजपत्रकास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात पार पडलेल्या या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

महापालिकेच्या वृक्षसंवर्धन विभागाकडे वृक्षकर, वृक्षतोड लाकूड विक्री, अनुदान, देणगी, झाडतोड खर्च वसुली, रोपे विक्री, विनापरवाना झाडे तोडल्याबाबत नागरिकांकडून वसुल केलेली तडजोड रक्कम, महापालिका सेवा शुल्क आदी बाबींच्या माध्यमातून सुमारे ६२ कोटी ४६ लाख १० हजार ५०० रुपये जमा होणार आहेत. या जमा होणाऱ्या रकमेच्या शिल्लक रकमेसह २०२४-२५ चे सुधारित व २०२५-२६ च्या एकूण ५७ कोटी ३६ लाख ८६ हजार रुपयांच्या मुळ अंदाजपत्रकास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.v

### अंदाजपत्रकातील रक्कम विकासकामांसाठी

वृक्षसंवर्धन विभागाने सादर केलेल्या अंदाजपत्रकातील रक्कम विविध उपक्रम, विकासकामांसाठी खर्च करण्यात येणार आहे. त्यामध्ये कार्यालयीन खर्चासह फळाफुलांचे प्रदर्शन भरविणे, झाडांचे पुर्नरोरपण करणे, पिंजरे खरेदी व दुरूस्ती करणे, वृक्षगणना करणे, तार कुंपण देखभाल दुरूस्ती करणे, विविध उद्यानांची देखभाल दुरूस्ती करणे, गायरान व मोकळ्या जागांमध्ये वृक्षरोपण तसेच संवर्धन करणे, नर्सरी साहित्य खरेदी करणे आदी कामांचा समावेश आहे.

---

## आयुर्वेदाच्या माध्यमातून आता रोजगाराची संधी

### पंचकर्म थेरपिस्ट कोर्स आता राष्ट्रीय आयुर्वेद विद्यापीठ मान्यता प्राप्त

### निर्विकार ज्ञानसंकुलच्या चार आयुर्वेद अभ्यासक्रमांना राष्ट्रीय मान्यता

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**निर्विकार ज्ञानसंकुलला राष्ट्रीय आयुर्वेद विद्यापीठाच्या प्रशिक्षण मान्यता मंडळाकडून चार आयुर्वेद अभ्यासक्रमांसाठी अधिकृत मान्यता प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. या महत्वपूर्ण निर्णयामुळे आता आयुर्वेदाचे ज्ञान मिळवण्याचा मार्ग सोपा झाला आहे. यातून रोजगाराच्या अनेक संधी देखील उपलब्ध होणार आहेत.**

निर्विकार आयुर्वेद
A VILLAGE OF WELL-BEING

निर्विकार ज्ञानसंकुलला राष्ट्रीय आयुर्वेद विद्यापीठाच्या प्रशिक्षण मान्यता मंडळाकडून हा सन्मान आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या समारंभाला आयुष सचिव पद्मश्री वैद्य राजेश कोटेचा, पद्मभूषण वैद्य देवेंद्र त्रिगुणा, एनसीएसआयएम अध्यक्ष वैद्य जयंत देवपुजारी आणि आयुष सल्लागार वैद्य मनोज नेसरी उपस्थित होते.

मान्यता प्राप्त अभ्यासक्रमांमध्ये सर्व सामान्यांसाठी पंचकर्म थेरपिस्ट कोर्सचा समावेश आहे.आयुर्वेद विद्यार्थी व डॉक्टरांसाठी आयुर्वेद प्रमाणपत्र अभ्यासक्रम, आयुर्वेद आणि पंचकर्म निर्विकार अडव्हान्स्ड कोर्स, स्त्रीरोग विज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम यांचा समावेश आहे..



#### निर्विकार ज्ञानसंकुलाने गाठला नवा अध्याय


आयुष मंत्रालयाकडून मिळालेल्या मान्यतेमुळे निर्विकार ज्ञानसंकुलने आयुर्वेद शिक्षण आणि प्रशिक्षण क्षेत्रात एक नवा आयाम गाठला आहे आणि गुणवत्तापूर्ण आयुर्वेद शिक्षणासाठी एक विश्वासार्ह संस्था म्हणून स्थान मिळवले आहे.

बऱ्याच अभ्यासांमधून असे दिसून आले आहे, की विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी रोगप्रतिकार शक्ती बळकट असावी आणि रोग प्रतिकारशक्ती वाढविण्याच्या गुणधर्मांमुळे आयुर्वेद या संक्रमण काळात प्रत्येकासाठी अधिक विश्वासार्ह झाला आहे.

### मान्यता प्राप्त अभ्यासक्रम:

सर्व सामान्यांसाठी
□ पंचकर्म थेरपिस्ट कोर्स
आयुर्वेद विद्यार्थी व डॉक्टरांसाठी
□ प्रमाणपत्र अभ्यासक्रम – आयुर्वेद
□ निर्विकार अडव्हान्स्ड कोर्स – आयुर्वेद आणि पंचकर्म
□ प्रमाणपत्र अभ्यासक्रम – स्त्रीरोग विज्ञान
या महत्त्वपूर्ण मान्यतेमुळे निर्विकार ज्ञानसंकुलने आयुर्वेद शिक्षण आणि प्रशिक्षण क्षेत्रात एक नवा आयाम गाठला आहे आणि गुणवत्तापूर्ण आयुर्वेद शिक्षणासाठी

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### प्रपंचात भगवंताचे अनुसंधान ठेवा.

तुम्ही इथे इतकेजण जमला आहात, त्यांपैकी कुणीही मला सांगावे की, आपली सर्व धडपड कशाकरिता असते? प्रत्येकजण सुखासाठी खटपट करीत असतो. प्रपंचात सुख मिळावे असे सर्वांना वाटत असते आणि त्याकरिता जो तो प्रयत्न करीत असतो. परंतु आजपर्यंत प्रपंचात कुणाला सुख मिळाले आहे ? ज्याला मिळाले असेल त्याने तसे सांगावे. कुणी म्हणतो, मजजवळ संपत्ती आहे पण संतान नाही; कुणी दारिद्र्य आहे म्हणून रडतो; कुणी काही, कुणी काही, सांगतच असतो, आणि म्हणतो की, माझी इच्छा पूर्ण झाल्यावर मी सुखी होईन. पण ती इच्छा तृप्त झाल्यावर दुसरी तयारच असते. म्हणजेच, आपली हाव कधीच तृप्त होणे शक्य नाही. मृगजळ पिऊन कुणी कधी तृप्त झाला आहे का ? प्रपंचच जिथे खोटा तिथे सुख कसले मागता ? याचा अर्थ असा नाही की प्रपंच सोडावा; पण तो सुखाचा कसा होईल हे पाहात जावे. मी तुम्हांला खात्रीने सांगतो की, प्रपंच जर सुखाचा करायचा असेल तर त्याला एकच उपाय आहे. तो अगदी सोपा आहे, तो म्हणजे, 'प्रपंच माझा नाही, तो रामाचा आहे' असे म्हणा म्हणजे झाले. हे दिसण्यात सोपे आहे. पण आचरणात आणायला अत्यंत कठीण आहे; ते परमात्म्याची कृपा झाल्याशिवाय साधायचे नाही. याकरिता रामाला अनन्यभावाने शरण जावे म्हणजे त्याची कृपा होईल. त्याच्या कृपेला तुम्ही देहबुद्धीचा बंधारा घालू नका. सर्व विसरून भगवंताला आळवावे. भगवंताची कृपा आपल्यावर आहेच असे म्हणावे. ती काम करीतच असते, आपण आपल्या शंकेने ती झाकून टाकू नये. आपण भगवंताला म्हणावे, "भगवंता, मी सर्वस्वी तुझा आहे. माझा प्रपंच हा तुझाच आहे. तुझी भक्ती कशी करावी हे मला माहीत नाही. तू मला मार्ग दाखव. तू जे करशील त्यात मी सामील होईन." अशी अगदी मनापासून प्रार्थना करावी. मग तो ठेवील त्या परिस्थितीमध्ये आपण अगदी आनंदात राहावे.

तुम्ही इतके कष्ट घेऊन मला भेटायला येता, पण रिकामे परत जाता हे पाहून मला वाईट वाटते. माझ्याजवळ जे आहे ते तुम्हांला व्यावहारिक जगात कुठेही मिळायचे नाही. ते म्हणजे भगवंताच्या नामाचे प्रेम होय. जे संतांनी सांगितले आहे तेच मी सांगतो; ते सत्य आहे असे मनापासून समजा, खरोखर राम तुम्हांला सुखी करील. तुम्हांला माझा आशीर्वाद आहे की तुम्हांला नामाचे म्हणजे भगवंताचे प्रेम खात्रीने लाभेल.

**बोधवचन:- सुखाने प्रपंच करा, पण त्यामध्ये भगवंताचे अनुसंधान ठेवा.**



**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# प्रत्येक मुस्लिम दहशतवादी नाही : पण, प्रत्येक दहशतवादी मुस्लिम कसा काय?

**नागपूर शहरात विनाकारण दंगल पेटली. गेले आठवडाभर महाराष्ट्रात सर्वच राजकीय पक्षांमध्ये समुद्रमंथन सुरू असून औरंग्याच्या कबरीवरून उलट सुलट येणाऱ्या बातम्यांमुळे नागपूरमध्ये तणाव वाढला आणि त्याचा शेवट तेथील भीषण दंगलीमध्ये झाला. अनेक नेत्यांनी याबद्दल प्रतिक्रिया व्यक्त केल्या आणि उगीचच मुस्लिमांना वेठीस धरू नका, अशा सूचना केल्या गेल्या. तरीपण एक प्रश्न उपस्थित होतो, की प्रत्येक मुस्लिम हात दहशतवादी नसतो, हे मान्य..पण, सापडणारा प्रत्येक दहशतवादी हा मुस्लिम कसा असतो ?**




### मुख्य 'टार्गेट' पोलीस आणि हिंदूंची घरे..

अतिशय वाईट पद्धतीने ही दंगल झाली, त्यामध्ये हिंदूंच्या घर, गाड्यांबरोबरच पोलिसांना देखील 'टार्गेट' केले गेले आणि बरेच पोलीस जखमी आहेत, बऱ्याच जणांना गंभीर स्वरूपाच्या जखमा झाल्या आहेत. कुठेही झालेली जातीय दंगल हा अत्यंत निषेधार्थ आणि क्लेशदायक प्रसंग आहे! शांतताप्रिय समाजाला आणि आपल्या महाराष्ट्राला दंगलीच्या वेदना पुढील कित्येक वर्षे होत असतात, हे महत्त्वाचे !

### नागपूरची दंगल पूर्वनियोजितच!

या निमित्ताने दुसरा एक विचार मनात येऊन जातो. महाराष्ट्रामध्ये 'महायुती' चे सरकार सत्तेवर आल्यापासून महाविकास आघाडीचे काहीतरी कारनामे सुरू आहेतच. फडणवीस हे मुख्यमंत्री झाल्यामुळे तर अनेकांचा पोटशूळ उठला आहे, उघडपणे ते जातीयवादी उल्लेख करून फडणवीस यांचे खच्चीकरण करीत आहेत.

### राज्यातील अशांततेसाठी वाटेल ते..

आपला महाराष्ट्र अशांत करण्यासाठी म्हणूनच कधी लाडक्या लेकींना भडकावले जाते, कधी शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळले जाते. प्रचंड गुंतवणूक होत असून देखील युवकांना बेरोजगारी ठरवून सरकारला बदनाम केले जाते. थोडक्यात काय, जनतेने 'महायुती' ला भरभरून दिलेला कौल सहन न झाल्यामुळे बेछूट आणि बेताल वक्तव्ये करून विकासाच्या वाटेवर असलेला महाराष्ट्र अशांत करण्याचा कट रचला जात आहे. अशा प्रकारच्या दंगली भडकल्या तर अस्थिर झालेल्या महाराष्ट्रात गुंतवणूक कशी होईल? विकास रखडला जाईल, अशी कारस्थाने केली जात आहे, हे निश्चित !

### दंगलीसाठीच औरंग्याचे उदात्तीकरण !

दंगली घडवण्याच्या कटाचा एक भाग म्हणून आता औरंग्याचे उदात्तीकरण सुरु झाले आहे. मुस्लिमांच्या तुष्टिकरणासाठी झाडून सगळे 'आघाडी'चे नेते औरंग्याची पालखी उचलायला तयार झाले आहेत. त्यांना माहीत आहे की 'महायुती' सरकार छत्रपती शिवरायांच्या तत्त्वांवर आणि भूमिकेवर राज्य कारभार करीत आहे. हे असेच सुरू राहिले तर पुढील कित्येक वर्षे तो महाविकास आघाडीला सत्तेची खुर्ची मिळणे महाअवघड जाणार आहे, त्यामुळेच अशा कारस्थानांचा हा प्रपंच !

### महाराष्ट्रापेक्षा देवेंद्रचे शहर अशांत करा..

संपूर्ण महाराष्ट्र अशांत करण्यापेक्षा फडणवीस यांच्या गावातच त्यांना कोंडीत गाठण्याची कल्पना या 'आघाडी' ने अमलात आणलेली दिसते. त्यातूनच त्यांनी दंगलीसाठी नागपूरची निवड केली आणि अचूक संधी साधली. या कटाचा एक भाग म्हणून गेल्या काही दिवसांपासून नटद्रष्ट अबू आझमी, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केलेली विधाने आणि नागपूरमध्ये झालेला प्रकार यातून एक प्रश्न नक्की मनात येतो, की महाराष्ट्र अशांत करण्याची ही पूर्वनियोजित दंगल आहे आणि देवेंद्र यांच्या शहरांमधूनच राज्य असंतुष्ट करण्याचे मुद्दे पुढे आणले जात आहेत.

### औरंग्याचा रक्तरंजित इतिहास..

देवदेवतांच्या आशीर्वादाचे शिंपण असलेल्या महाराष्ट्राच्या पवित्र मातीला औरंग्याने रक्ताने माखण्याचा प्रयत्न केला, येथील अनेक पवित्र ठिकाणांची नावे बदलण्याचा प्रयत्न केला. ज्या क्रूर औरंग्याने महाराष्ट्राला उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला, हिंदूंवर भयानक अत्याचार केले, त्या औरंग्याबद्दल विरोधी पक्षांना एवढा पुळका असणे, किती धोकादायक आहे, याची प्रचितीच नागपूरच्या दंगलीतून दिसून येते. औरंगाबाद आणि उस्मानाबादच्या छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव होण्यामुळे ज्या नेत्यांचे पोट दुखले, आम्ही औरंगाबादच म्हणणार, अशी भीमगर्जना ज्यांनी केली, तेच नेते आज महाराष्ट्रात अराजकता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत, असा आरोप म्हणूनच होत आहे.

### पाहा, तर नागपूर मध्ये काय घडले?

'औरंग्याच्या कबरीविरोधी सुरू असलेले आंदोलन चिघळले आणि सोमवारी रात्री नागपुरात दोन गट भिडले. अपेक्षेप्रमाणे तणाव वाढला, दोन्ही गट समोरासमोर आल्यामुळे पोलिसांना लाठीमार करावा लागला. त्यानंतर परस्परांवर दगडफेक झाली, अनेक वाहनांची जाळपोळ करण्यात आली आणि संतप्त दगडफेकीत अनेक पोलीस जखमी झाले.

### पेट्रोल बॉम्ब आणि तुफान दगडफेक..

यावेळी पेट्रोल बॉम्ब फेकण्यात आले आणि रस्त्यावर लावलेल्या अनेक गाड्या फोडण्यात आल्या. या गाड्या हिंदूंच्याच आहेत, हे पाहून त्यावर हल्ले चढवण्यात आले, असे पोलिसांचे म्हणणे आहे. म्हणूनच ही पूर्वनियोजित दंगल होती, असे म्हणण्याचे धाडस करावे वाटते.

### प्रचंड राडा, जाळपोळ आणि दगडफेक

नागपूर शहरातील महाल परिसरात दोन गटांत हा राडा झाला. बाजूच्या मुस्लिम वस्त्यांमधील जमाव महालच्या शिवाजी चौकात आला. या जमावाने घोषणाबाजी करताच, दोन्ही गट एकमेकांविरुद्ध आक्रमक झाले. दोन्हींकडून परस्परांवर दगडफेक करून गाड्यांचीही जाळपोळ करण्यात आली. तणाव निवळण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडून स्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, जमावाने पोलिसांवरच दगडफेक केल्यामुळे तणावात भर पडली. हिंसक जमावाचा रोख आणि रोष विश्व हिंदू परिषदेने दुपारी केलेल्या आंदोलनासंदर्भात होता.

### दोन्ही बाजूंनी तुफान घोषणाबाजी!

घोषणाबाजी सुरू होताच परिसरातील दुसऱ्या गटानेही घोषणाबाजी सुरू केली. त्यानंतर पोलिसांना पाचारण करण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत घोषणाबाजी करणाऱ्या दोन्ही गटांना चिटणीस पार्कच्या दिशेने मागे ढकलले. यानंतर दोन्ही गटांत तुफान राडा झाला आणि दगडफेक आणि जाळपोळही करण्यात आली. पोलीस आयुक्तांवर कुऱ्हाडीने हल्ला होतो, याला काय म्हणावे?

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# नागपुरात तणावपूर्ण शांतता!

## 150 पेक्षा अधिक लोकांवर गुन्हे दाखल करून अटक




। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**नागपुरात कबर हटवण्याच्या मागणीवरून सोमवारी रात्री (१७ मार्च) मोठा तणाव निर्माण झाला. दोन गटात झालेल्या दगडफेक आणि जाळपोळच्या घटनेमुळे नागपुरात सध्या तणावपूर्ण शांतता आहे. दरम्यान, भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ अंतर्गत नागपूर शहरातील अनेक भागात संचारबंदी लागू करण्यात आली आहे, अशी माहिती महाराष्ट्र पोलिसांच्या अधिकृत अधिसूचनेतून समोर आली आहे. या दंगल प्रकरणावरुन विरोधकांनी राज्य सरकारवर टीकेची झोड उठविली आहे.**

औरंगजेब कबरीच्या वादावरून सोमवारी रात्री 8:30 वाजता नागपूरच्या महाल परिसरात हिंसाचार उसळला. विश्व हिंदू परिषदेने (विहिंप) मुघल सम्राट औरंगजेबाचा पुतळा जाळला आणि त्याची कबर पाडण्याची मागणी केली. यानंतर दगडफेक आणि तोडफोड सुरू झाली. दंगलखोरांनी घरांवर दगडफेक केली आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या वाहनांना आग लावली. पोलिसांवरही हल्ला झाला. कुऱ्हाडीच्या हल्ल्यात डीसीपी निकेतन कदम जखमी झाले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी अश्रूधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. नागपूर पोलीस आयुक्त रविंदर कुमार सिंगल यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, पुढील सूचना मिळेपर्यंत निर्बंध लागू राहतील. कोतवाली, गणेशपेठ, तहसील, लकडगंज, पाचपावली, शांतीनगर, सक्करदरा, नंदनवन, इमामवाडा, यशोधरानगर आणि कपिलनगर येथील पोलीस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लागू करण्यात आली आहे. तसंच, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना प्रभावित भागातील रस्ते बंद करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. संचारबंदीचे उल्लंघन करणारा कोणीही भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ अंतर्गत दंडनीय राहील. दरम्यान, नागपूरचे पोलीस आयुक्त रविंदर सिंगल यांनी रहिवाशांना आश्वासन दिले की परिस्थिती आता नियंत्रणात आहे. ते म्हणाले, सध्या परिस्थिती शांत आहे. एक फोटो जाळण्यात आला, त्यानंतर लोक जमले. या गर्दीला पांगवण्याचा आम्ही प्रयत्न केला. या संदर्भात आम्ही कारवाई केली. आरोपींवर कारवाई केली जाईल. नागपूरचे डीसीपी अर्चित चांडक यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना काही अफवांमुळे घडली आहे. आता परिस्थिती नियंत्रणात आहे. आमचे पथक येथे उपस्थिती असून, मी सर्वांना आवाहन करतो की कोणीही कारणाशिवाय घराबाहेर पडू नका. किंवा दगडफेक करू नका. दगडफेक सुरू होती, म्हणून आम्ही बळाचा आणि अश्रूधुराचा वापर केला. अग्निशमन दलाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, २ जेसीबी आणि २-३ इतर वाहने पेटवण्यात आली आहेत. यात आमचा एक अग्निशमन कर्मचारी जखमी झाला आहे.शांतताप्रिय नागपुरातील महाल परिसरात सोमवारी घडलेली हिंसाचाराची घटना दुर्भाग्यपूर्ण असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहे. तथापि, विरोधकांनी या घटनेचे राजकारण न करता समाजकंटकाना शोधण्यासाठी मदत करावी.

### जे काही झाले ते योग्य नाही- ओवेसी

गेल्या काही आठवड्यांत महाराष्ट्र सरकारचे मुख्यमंत्री आणि इतर मंत्री जी विधाने करत आहेत ते पाहण्याची गरज आहे. सरकारकडून अत्यंत भडकाऊ विधाने येत आहेत. त्यांना आपली जबाबदारीही कळत नाही की ते मंत्री आणि मुख्यमंत्री आहेत. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात एका खास बादशाहाचे पुतळे जाळले, त्यावर काही प्रतिक्रिया आली नाही आणि त्यांना हे आवडले नाही. त्यामुळे त्यांनी कपड्यावर कुराणच्या ओळी लिहून जाळल्या. हे होत असताना हिंदू आणि मुसलमानांनी डीसीपीकडे तक्रार केली. त्यांनी कोणतीही कारवाई केली नाही त्यानंतर हिंसाचार झाला. हे सरकार आणि गुप्तचर विभागाचे अपयश आहे. जे झाले ते योग्य नाही.

# 'मी वक्तव्यावर ठाम, माफी मागणार नाही

## सपकाळांचं स्पष्टीकरण; फडणवीसांची औरंगजेबाशी केली होती तुलना





। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**गेल्या काही दिवसांपासून औरंगजेबाच्या कबरीवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी काही दिवसांपूर्वी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची औरंगजेबाशी तुलना करणारे विधान केलं होतं. "औरंगजेब क्रूर शासक होता, आज देवेंद्र फडणवीसही तेवढेच क्रूर आहेत", असं सपकाळ यांनी म्हटलं होतं. त्यांच्या या विधानानंतर त्यांच्यावर टीकेची झोड उठली होती.**

यानंतर आता हर्षवर्धन सपकाळ यांनी आपल्या विधानावर स्पष्टीकरण देत आपण वक्तव्यावर ठाम असून माफी मागणार नसल्याचं म्हटलं आहे.मी महायुती सरकारच्या कारभाराची तुलना औरंगजेबाच्या कारभाराशी केली. त्याचा मोठा संदर्भ आहे. मी असाच संदर्भ देऊन बीडमध्ये देखील बोललो होतो. आता या विषयाच्या संदर्भात भाजपाचे नेते आणि त्यांचे मित्रपक्ष त्यांना औरंगजेब म्हणण्यात का गुंतले आहेत? हे मला काही समजत नाही. औरंगजेब क्रूर होता, हेच माझं म्हणणं होतं आणि मी देखील तेच म्हटलं होतं. यात औरंगजेबाच्या उदात्तीकरणाचा काही विषय नाही", असं हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे."मी जे विधान केलं ते विधान राज्यकारभाराच्या अनुषंगाने होतं. औरंगजेब ज्या क्रूर पद्धतीने राज्यकारभार चालवत होता, त्याच पद्धतीने देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारचा कारभार चालला आहे, असं विधान केलं होतं. त्या विधानावर मी अद्यापही ठाम आहे. जसं औरंगजेबाने जिझिया कर लावला होता, तसाच कर आता महाराष्ट्रातील सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस लावत आहेत. शाळेच्या वह्या, पुस्तकावर कर लावला, स्मशान भूमीतील लाकडांवरही कर लावला आहे. त्यामुळे ही सर्व कार्यप्रणाली त्याच प्रकारची आहे", असं हर्षवर्धन सपकाळ म्हणाले आहेत.आमची ही राजकीय टीका आहे. देवेंद्र फडणवीस यांच्यावर जेव्हा टीका केली तेव्हा शब्दांचा तोल कुठेही गेलेला नाही. फडणवीस हेच औरंगजेब आहेत असं मी बोललेलो नाही. त्यांनी तशीच वेशभूषा करावी आणि ते तसेच आहेत असं मी म्हटलेलं नाही. देवेंद्र फडणवीस यांच्यावर मी व्यक्तिगत टीका केलेली नाही. राज्य कारभारावर टीका केलेली आहे आणि ती टीका करणं हा आमचा अधिकार आहे. तसेच मी केलेली टीका अतिशयोक्ती नाही. आता ही महाराष्ट्राच्या अस्मितेवरची टीका असल्याचं भाजपाच्या प्रदेशाध्यक्ष म्हटलं. मात्र, जेव्हा संतोष देशमुख यांची हत्या होते, तेव्हा महाराष्ट्राच्या अस्मितेला धक्का लागत नाही का? स्वारगेटच्या बसस्थानकात अत्याचाराची घटना घडते तेव्हा महाराष्ट्राच्या अस्मितेला धक्का लागत नाही का?

### सपकाळ काय म्हणाले होते?

"औरंगजेब हा क्रूर शासक होता. औरंगजेबाने स्वतः:च्या वडिलांना जेलमध्ये टाकलं. आज देवेंद्र फडणवीस हे देखील तेवढेच क्रूर आहेत. ते देखील कायम धर्माचा आधार घेतात. त्यामुळे दुर्देवाने औरंगजेब आणि देवेंद्र फडणवीस यांचा कारभार हा सारखाच आहे", असं विधान हर्षवर्धन सपकाळ यांनी केलं होतं.

# रशिया-युक्रेन युद्ध थांबणार?

## डोनाल्ड ट्रम्प आणि व्लादिमिर पुतिन यांच्यात फोनवरून चर्चा

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**रशिया आणि युक्रेनमध्ये गेल्या दोन वर्षापेक्षा जास्त काळापासून संघर्ष सुरु आहे. या संघर्षात रशिया सातत्याने युक्रेनवर हल्ले करत आहे. या युद्धात युक्रेनची अनेक शहरे उद्ध्वस्त होत आहेत. एवढंच नाही तर या युद्धाचे परिणाम जगभरात देखील पाहायला मिळतात. मात्र, आता युक्रेन-रशियातील संघर्ष तात्पुरता थांबण्यासाठी अमेरिका प्रयत्न करत असल्याचं पाहायला मिळत आहे. यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे मध्यस्थी करत असून त्यांची मध्यस्थी सफल होण्याची शक्यता आहे.**



युक्रेनने देखली युद्धबंदीबाबत तयारी दर्शवली आहे. तसेच या संदर्भात सौदी अरेबियामध्ये अमेरिका आणि युक्रेनियन अधिकाऱ्यांमध्ये काही दिवसांपूर्वी उच्चस्तरीय चर्चाही झाली. आता व्हाईट हाऊस आणि कीव यांच्या संयुक्त निवेदनानुसार, युद्धबंदी प्रस्तावात तात्पुरती युद्धबंदीची तरतूद आहे. जी दोन्ही बाजूंनी मान्य केल्यास वाढवता येऊ शकते. दरम्यान, युक्रेनने याबाबत आपली वचनबद्धता दर्शविलेली आहे. त्यामुळे आता रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची भूमिका काय असणार? याकडे अवघ्या जगाचं लक्ष लागलेलं आहे. यातच आज (१८ मार्च) अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्यात फोनवरून चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. डोनाल्ड ट्रम्प आणि व्लादिमिर पुतिन यांनी फोनवरून संवाद साधत युक्रेन-रशियातील युद्धविरामाबाबतीत चर्चा केली असल्याची माहिती व्हाईट हाऊसकडून देण्यात आली आहे.

याबाबत व्हाईट हाऊसचे डेप्युटी चीफ ऑफ स्टाफ यांनी माहिती दिली असून डोनाल्ड ट्रम्प आणि व्लादिमिर पुतिन यांच्यात संवाद सुरु आहे. तसेच हा संवाद सकारात्मक होत आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.दरम्यान, युक्रेनमधील युद्ध थांबवण्यासाठी अमेरिका व युक्रेन दरम्यान युद्धविरामाचा करार झाला असून त्यानुसार ३० दिवस युद्ध थांबवण्यालाठी प्रयत्न सुरु आहेत. तसेच त्यानंतर या कराराचा कायमस्वरूपी विस्तार करण्यासाठी प्रयत्न केले जातील. अमेरिकने या कराराचा प्रस्ताव रशियासमोर मांडलेला आहे. मात्र,

### अमेरिका व युक्रेन दरम्यान करार

या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.दरम्यान, युक्रेनमधील युद्ध थांबवण्यासाठी अमेरिका व युक्रेन दरम्यान युद्धविरामाचा करार झाला असून त्यानुसार ३० दिवस युद्ध थांबवण्यालाठी प्रयत्न सुरु आहेत. तसेच त्यानंतर या कराराचा कायमस्वरूपी विस्तार करण्यासाठी प्रयत्न केले जातील.

या करारावर व्लादिमिर पुतिन यांनी त्यातील काही अटींवर प्रश्न उपस्थित केले होते. पण ट्रम्प यांनी हे युद्ध थांबवण्यासाठी आग्रह धरला आहे. त्यामुळे आता व्लादिमिर पुतिन यांच्या भूमिकेकडे लक्ष लागलेलं आहे.युक्रेनने देखली युद्धबंदीबाबत तयारी दर्शवली आहे. तसेच या संदर्भात सौदी अरेबियामध्ये अमेरिका आणि युक्रेनियन अधिकाऱ्यांमध्ये काही दिवसांपूर्वी उच्चस्तरीय चर्चाही झाली. आता व्हाईट हाऊस आणि कीव यांच्या संयुक्त निवेदनानुसार, युद्धबंदी प्रस्तावात तात्पुरती युद्धबंदीची तरतूद आहे. जी दोन्ही बाजूंनी मान्य केल्यास वाढवता येऊ शकते. दरम्यान, युक्रेनने याबाबत आपली वचनबद्धता दर्शविलेली आहे. त्यामुळे आता रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची भूमिका काय असणार? याकडे अवघ्या जगाचं लक्ष लागलेलं आहे. यातच आज (१८ मार्च) अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्यात फोनवरून चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. डोनाल्ड ट्रम्प आणि व्लादिमिर पुतिन यांनी फोनवरून संवाद साधत युक्रेन-रशियातील युद्धविरामाबाबतीत चर्चा केली असल्याची माहिती व्हाईट हाऊसकडून देण्यात आली आहे. याबाबत व्हाईट हाऊसचे डेप्युटी चीफ ऑफ स्टाफ यांनी माहिती दिली असून डोनाल्ड ट्रम्प आणि व्लादिमिर पुतिन यांच्यात संवाद सुरु आहे. तसेच हा संवाद सकारात्मक होत आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं आहे.

---

# रान्या रावच्या २ वर्षांत ५२ दुबई फेऱ्या

## सोन्याच्या तस्करी प्रकरणात मोठी माहिती समोर

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**कन्नड अभिनेत्री रान्या राव हिला ४ मार्च रोजी बंगळुरूच्या कॅम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावरून अटक करण्यात आली होती. सोन्याची तस्करी केल्याच्या प्रकरणात पोलिसांनी ही कारवाई केली. तिची झडती घेण्यात आली असता तब्बल १४.८ किलो सोनं आढळून आलं होतं. यानंतर मोठी खळबळ उडाली होती. आता या प्रकरणाचा तपास पोलिसांकडून करण्यात येत असून दररोज या प्रकरणात धक्कादायक माहिती समोर येत आहे.**

दरम्यान, सोच्या तस्करी प्रकरणात अटक करण्यात आलेली कन्नड अभिनेत्री रान्या रावने अभिनेता मित्र तरुण राजूबरोबर दुबईला किमान २६ फेऱ्या मारल्या होत्या. त्याच दरम्यान त्यांनी सोन्याची तस्करी केल्याचं महसूल संचालनालयाच्या (डीआरआय) अधिकाऱ्यांनी मंगळवारी न्यायालयात माहिती दिली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेच्या हवाल्याने हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.वृत्तानुसार, डीआरआयने न्यायालयीन कार्यवाहीदरम्यान या प्रकरणाबद्दल नवीन तपशील उघड केले आहेत. यामध्ये म्हटलं की, रान्या रावच्या २ वर्षांत ५२ दुबई फेऱ्या झाल्या आहेत, तर ५२ पैकी २६ फेऱ्यात मित्र तरुण राजू हा देखील बरोबर होता. या प्रवासाच्या पद्धतीमुळे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.



यात अनेकदा रान्या राव आणि तरुण राजू हे सकाळी जायचे आणि संध्याकाळी परत यायचे. त्यांच्या या पद्धतीमुळे संशय निर्माण झाला, असं डीआरआयने न्यायालयाला सांगितलं. वृत्तात असंही म्हटलं आहे की, रान्या राव आणि मित्र तरुण राजू यांच्यात आर्थिक व्यवहार असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. रान्या रावने बुक केलेल्या तिकिटावर तरुण राजूनेही दुबईहून हैदराबादला प्रवास केला. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, २०२३ ते मार्च २०२५ या दरम्यान रान्या रावने दुबईला ५२ फेऱ्या मारल्या. त्यापैकी किमान २६ फेऱ्यांमध्ये राजू तिच्याबरोबर होता. त्यामुळे संशय निर्माण होतो की याच दरम्यानच्या प्रवासात सोने तस्करी करण्यासाठी

### नेमकं प्रकरण काय?

डीआरआयने न्यायालयीन कार्यवाहीदरम्यान या प्रकरणाबद्दल नवीन तपशील उघड केले आहेत. यामध्ये म्हटलं की, रान्या रावच्या २ वर्षांत ५२ दुबई फेऱ्या झाल्या आहेत, तर ५२ पैकी २६ फेऱ्यात मित्र तरुण राजू हा देखील बरोबर होता. या प्रवासाच्या पद्धतीमुळे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

करण्यात आला होता.कर्नाटकचे डीजीपी रामचंद्र राव यांची सावत्र मुलगी रान्या राव हिला ३ मार्च रोजी दुबईहून परतताना बेंगळुरू विमानतळावर १२.५६ कोटी रुपयांच्या १४.२ किलो सोन्यासह अटक करण्यात आली होती. त्यानंतर तिच्या निवासस्थानावर छापा टाकण्यात आला आणि २.०६ कोटी रुपयांचे सोन्याचे दागिने आणि २.६७ कोटी रुपये रोख जप्त करण्यात आले होते. तिला अटक करण्यात आल्यानंतर ती अद्याप कोठडीत आहे. तिचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला. महसूल गुप्तचर संचालनालय (डीआरआय) आणि इतर एजन्सींनी केलेल्या तपासात अशी माहिती समोर आली की रावने या वर्षी किमान २६ वेळा दुबईला प्रवास केला आणि विमानतळ सुरक्षा प्रोटोकॉलचे उल्लंघन करून प्रत्येक ट्रिपमध्ये मोठ्या प्रमाणात सोन्याची तस्करी केल्याचा आरोप आहे.

# "माझा शंभू" गाण्याच्या माध्यमातून संभाजी महाराजांबद्दल जागृती

## 'छावा' चित्रपटाची प्रेरणा - E2M बँडची संकल्पना




मुंबई : "छावा" चित्रपट पाहिल्यानंतर अनेक लहानग्यांच्या मनात एकच प्रश्न उमटला – आम्हाला शिवाजी महाराज शिकवले, पण संभाजी महाराजांबद्दल का सांगितले जात नाही? या प्रश्नाने प्रेरित होऊन E2M बँडने "माझा शंभू" हे गाणे नुकतेच साकारले आहे. या गाण्याच्या माध्यमातून छत्रपती संभाजी महाराज विद्यार्थ्यांना शालेय जीवनातच शिकवणे महत्वाचे असल्याचे अधोरेखित केले आहे. हे गाणे गीतकार सई आणि दिपिका पाटे यांनी लिहिले असून, यात इंफ्लुएन्सर पोस्टर बॉय चेतन यांनी शिक्षकाची भूमिका साकारली आहे. तसेच बोरिवली पूर्व अभिनव विद्या मंदिरच्या विद्यार्थ्यांनीही यात सहभाग घेत उत्तम काम केले आहे. "माझा शंभू" या गाण्यातून एक महत्त्वाचा संदेश दिला गेला आहे, संभाजी महाराज हे केवळ छत्रपती शिवाजी महाराजांचे पुत्र नव्हते, तर एक उत्तम योद्धा, कुशल प्रशासक आणि बलिदान देणारे धर्माभिमानी राजे होते. त्यांच्या पराक्रमामुळेच मराठा साम्राज्य पुढे टिकून राहिले. मात्र, अनेक शालेय अभ्यासक्रमांमध्ये त्यांच्या योगदानाला योग्य स्थान दिले जात नाही.

**इतिहास शिक्षणातील गंभीर पोकळी**

आज लाखो रुपये खर्चून पालक आपल्या मुलांचे शाळांमध्ये प्रवेश घेतात. मात्र, अनेक शाळांमध्ये इयत्ता पाचवीपर्यंत इतिहास विषय शिकवलाच जात नाही. पुढे जाऊन शिकवला गेला तरी, मराठ्यांच्या शौर्यापेक्षा मुघलांच्या इतिहासाला अधिक प्राधान्य दिले जाते. अशी तक्रार अनेक पालक करतात. यामुळेच लहान मुलांच्या मनात अनेकदा संभाजी महाराजांबद्दल अज्ञान राहते. "छावा" चित्रपट पाहिल्यानंतर अनेक मुलांना व पालकांना या गोष्टीची प्रकर्षाने जाणीव झाली. त्यामुळेच "माझा शंभू" या गाण्यातून शिक्षणव्यवस्थेकडे एका मोठ्या प्रश्नाची दखल घेण्याची मागणीही करण्यात आली आहे. त्याचबरोबर "माझा शंभू" या गाण्याला प्रेक्षकांकडून चांगली पसंती दिली जात असून सर्व निर्माते, कलाकार व सहकाऱ्यांचे कौतुक केले जात आहे.

# मला राशा थडानी खूप आवडते : माधुरी दीक्षित



'हम आपके हैं कौन', 'प्रहार: द फायनल अटॅक', 'मोहब्बत', 'दिल तो पागल है', 'पुकार', 'वजूद', 'बडे मियाँ छोटे मियाँ' ते 'भूल भूलैय्या-३' अशा अनेक चित्रपटांतून अभिनेत्री माधुरी दीक्षित(MADHURI DIXIT)ने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. अभिनयाबरोबरच अभिनेत्री तिच्या अनेक गाजलेल्या गाण्यांसाठी ओळखली जाते. 'धकधक गर्ल' म्हणूनही अभिनेत्रीची ओळख आहे. माधुरी दीक्षितचे 'एक-दो-तीन' हे गाणेदेखील चांगलेच गाजले होते. आता अभिनेत्रीने या गाण्याचा रिमेक कोणती अभिनेत्री करू शकते, यावर वक्तव्य केले आहे.आयफा पुरस्कार सोहळ्याच्या ग्रीन कार्पेटवर अभिनेत्रीने केलेले वक्तव्य चर्चेचा विषय ठरत आहे. माधुरी म्हणाली, "आताच्या तरुण पिढीमधील मला राशा थडानी खूप आवडते. ती उत्तम डान्स करते." जेव्हा तिला विचारले की, 'एक-दो-तीन' या गाजलेल्या गाण्याला आज कोण न्याय देऊ शकते? तर, त्याचे उत्तर देताना अभिनेत्रीने राशाचे नाव घेतले.१९८८ साली प्रदर्शित झालेल्या तेजाब या चित्रपटातील 'एक-दो-तीन' या गाण्याला मोठी लोकप्रियता मिळाली होती.

# अमिताभ सर्वाधिक कर भरणारे सेलिब्रिटी

बॉलीवूडचे महानायक अमिताभ बच्चन हे भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात दिग्गज अभिनेत्यांपैकी एक आहेत. मागील सहा वर्षांपासून ते इंडस्ट्रीत काम करत आहेत. ८२ वर्षांचे अमिताभ बच्चन या वयातही अनेक चित्रपटांमध्ये महत्त्वाच्या भूमिका साकारत आहेत. ते शेवटचे 'कल्की एडी 2898' मध्ये अश्वत्थामाच्या भूमिकेत झळकले होते. हा चित्रपट २०२४ मधील सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांपैकी एक होता. या चित्रपटाच्या दुसऱ्या भागाची तयारी सुरू आहे. याचदरम्यान अमिताभ बच्चन यांच्या उत्पन्नाबद्दल मोठी माहिती समोर आली आहे. पिंकव्हिलाच्या एका रिपोर्टनुसार, अमिताभ बच्चन यांनी २०२४-२५ या आर्थिक वर्षात तब्बल १२० कोटी रुपये कर भरला आहे. वर्षभरातील त्यांची एकूण कमाई ३५० कोटी रुपये होती. त्यांनी चित्रपट, ब्रँड एंडोर्समेंट्स आणि 'कौन बनेगा करोडपती' होस्ट करून ही कमाई केली आहे. ते वयाच्या ८२ व्या वर्षी सिनेविश्वात सर्वाधिक कमाई करणाऱ्या व्यक्तींपैकी एक ठरले आहेत.बिग बी यांनी १५ मार्च २०२५ रोजी २०२४-२५ या आर्थिक वर्षातील शेवटची ॲडव्हान्स टॅक्स इन्स्टॉलमेंट म्हणून तब्बल ५२.५० लाख रुपये भरले. अमिताभ बच्चन वेळेवर कर भरतात.



# भाईजानने केला रश्मिकासह जबरदस्त डान्स

सलमान खानच्या बहुचर्चित व बहुप्रतीक्षित 'सिकंदर' चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. गेल्या वर्षी 'सिकंदर' चित्रपटाची घोषणा झाली. तेव्हापासून सलमान खानच्या या चित्रपटाची क्रेझ पाहायला मिळत आहे. या चित्रपटाचे दोन टीझर प्रदर्शित झाल्यानंतर सध्या 'सिकंदर'मधील गाण्यांचा धुमाकूळ सुरू आहे. नुकतंच या चित्रपटातील नवीन गाणं प्रदर्शित झालं आहे.

या गाण्यात पुन्हा एकदा सलमान खान व रश्मिका मंदानाची केमिस्ट्री पाहायला मिळत आहे. एवढंच नाहीतर ५९ वर्षीय सलमानने जबरदस्त डान्स केला आहे. सलमान खान व रश्मिका मंदानाच्या 'सिकंदर' चित्रपटातील नवीन गाणं काही तासांपूर्वी प्रदर्शित झालं आहे. 'सिकंदर नाचे' असं गाण्याचं नाव आहे. या गाण्यामध्ये सलमान खान जबरदस्त डान्स करताना पाहायला मिळत आहे. तसंच सलमानच्या सोबतीला रश्मिकानेदेखील धमाकेदार डान्स केला आहे. सलमान व रश्मिकाने 'सिकंदर नाचे' गाण्यात टर्कीच्या डान्सर्ससह डान्स केला आहे.'सिकंदर नाचे' गाण्याच्या नृत्यदिग्दर्शन धुरा अहमद खानने सांभाळली होती. तसंच हे गाणं अमित मिश्रा आणि अकासा सिंहने गायलं आहे. तर 'सिकंदर नाचे' गाणं समीन अनजानने शब्दबद्ध केलं असून सिद्धांत मिश्राने संगीतबद्ध केलं आहे.

सलमान व रश्मिकाच्या या गाण्याला क्षणार्धात प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला आहे. काही दिवसांपूर्वी होळीचं औचित्य साधून 'सिकंदर' चित्रपटातील दुसरं 'बम बम भोले' गाणं प्रदर्शित झालं होतं. या गाण्यालादेखील भाईजानच्या चाहत्यांचा तुफान प्रतिसाद मिळाला होता.दरम्यान, 'सिकंदर' चित्रपटाच्या दिग्दर्शन ए.आर. मुरुगदॉस यांनी केलं आहे. ईदच्या मुहूर्तावरच २०२५मध्ये सलमानच्या हा बहुचर्चित चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात सलमान खान, रश्मिका मंदाना व्यतिरिक्त काजल अग्रवाल, शर्मन जोशी, प्रतीक बब्बर झळकणार आहे.

# सनरायझर्स हैदराबादने उभारला मजबूत संघ!

## कमिन्स, हेड, अभिषेक, क्लासेन, शमीसारखे खेळाडू संघात

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पॅट कमिन्सच्या नेतृत्वात आक्रमक पविञ्यासह खेळणाऱ्या सनरायझर्स हैदराबादने लिलावात चांगल्या खेळाडूंची निवड करत पुन्हा उत्तम संघ उभारला. गतवर्षीच्या आयपीएलचा उपविजेता संघ असलेल्या हैदराबादने अनेक नवीन चेहऱ्यांना संघात सामील करत हुशारीने संघबांधणी केली आहे. आयपीएल २०२५ पूर्वी हा संपूर्ण संघ कसा आहे, जाणून घेऊया.**




हैदराबाद संघाने युवा विकेटकीपर फलंदाज इशान किशनला ताफ्यात सामील केलं. दुसरीकडे त्यांनी अनुभवी मोहम्मद शमीला संघाचा भाग केलं, शिवाय त्याला साहाय्य करण्यासाठी हर्षल पटेलला समाविष्ट केलं. अभिनव मनोहरला घेण्यासाठी हैदराबाद संघव्यवस्थापन आतूर होतं आणि अखेरीस चुरशीच्या मुकाबल्यात हैदराबादने बाजी मारली. राहुल चहर या हुशार फिरकीपटूला त्यांनी आपल्याकडे वळवलं.सनरायझर्स हैदराबाद संघाने आयपीएल २०२४ मध्ये आयपीएलच्या इतिहासातील सर्वात मोठी धावसंख्या उभारत सर्वांचे लक्ष वेधून घेतलं. २०२४ मध्ये कर्णधार पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखाली सनरायझर्स हैदराबादने आक्रमक पवित्राने खेळत उत्कृष्ट कामगिरी केली. ट्रॅव्हिस हेड, हेनरिक क्लासेन आणि अभिषेक शर्मा यांनी तर अक्षरशः गोलंदाजांची बेदम धुलाई केली. हैदराबाद संघानेही आयपीएल २०२५ च्या लिलावापूर्वी याच ५ खेळाडूंना रिटेन केलं होतं.

यासह सनरायझर्स हैदराबादची विस्फोटक सलामी जोडी अभिषेक आणि ट्रॅव्हिस हेडच असेल. याशिवाय इशान किशन, नितीश रेड्डी, अभिनव मनोहर, हेनरिक क्लासेन हे खेळाडू मधल्या फळीत असतील. तर गोलंदाज ब्रायडन कार्स दुखापतीमुळे स्पर्धेबाहेर झाल्याने त्याच्या जागी संघाने आफ्रिकेचा अष्टपैलू वियान मुल्डर याला संघात सामील केले.

गोलंदाजीत कमिन्स उनाडकट, राहुल चहर, झाम्पा हे गोलंदाज दिसतील.पॅट कमिन्स (कर्णधार), अभिषेक शर्मा, नितीश रेड्डी, हेनरिक क्लासेन, ट्रॅव्हिस हेड, मोहम्मद शमी, हर्षल पटेल, इशान किशन, राहुल चहर, ॲडम झाम्पा, अथर्व तायडे, अभिनव मनोहर, सिमरजीत सिंग, झीशान अन्सारी, जयदेव उनाडकट, वियान मुल्डर, कामिंदू मेंडिस, अनिकेत वर्मा, एशान मलिंगा, सचिन बेबी.हैदराबाद संघाने युवा विकेटकीपर फलंदाज इशान किशनला ताफ्यात सामील केलं. दुसरीकडे त्यांनी अनुभवी मोहम्मद शमीला संघाचा भाग केलं, शिवाय त्याला साहाय्य करण्यासाठी हर्षल पटेलला समाविष्ट केलं. अभिनव मनोहरला घेण्यासाठी हैदराबाद संघव्यवस्थापन आतूर होतं आणि अखेरीस चुरशीच्या मुकाबल्यात हैदराबादने बाजी मारली.

### हे खेळाडू मधल्या फळीत असतील

सनरायझर्स हैदराबाद संघाने आयपीएल २०२४ मध्ये आयपीएलच्या इतिहासातील सर्वात मोठी धावसंख्या उभारत सर्वांचे लक्ष वेधून घेतलं. २०२४ मध्ये कर्णधार पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखाली सनरायझर्स हैदराबादने आक्रमक पवित्राने खेळत उत्कृष्ट कामगिरी केली. ट्रॅव्हिस हेड, हेनरिक क्लासेन आणि अभिषेक शर्मा यांनी तर अक्षरशः गोलंदाजांची बेदम धुलाई केली. हैदराबाद संघानेही आयपीएल २०२५ च्या लिलावापूर्वी याच ५ खेळाडूंना रिटेन केलं होतं.यासह सनरायझर्स हैदराबादची विस्फोटक सलामी जोडी अभिषेक आणि ट्रॅव्हिस हेडच असेल. याशिवाय इशान किशन, नितीश रेड्डी, अभिनव मनोहर, हेनरिक क्लासेन हे खेळाडू मधल्या फळीत असतील. तर गोलंदाज ब्रायडन कार्स दुखापतीमुळे स्पर्धेबाहेर झाल्याने त्याच्या जागी संघाने आफ्रिकेचा अष्टपैलू वियान मुल्डर याला संघात सामील केले.

# गुजरातमध्ये एकापेक्षा एक सरस खेळाडू!

## गुजरात टायटन्सचा संघ कसा असणार आहे, जाणून घेऊया

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयपीएलमधील पदार्पणाच्या हंगामातच जेतेपद पटकावणारा संघ म्हणून गुजरात टायटन्सने आपली ओळख तयार केली आहे. पाच खेळाडूंना रिटेन करणाऱ्या गुजरातने लिलावात दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडा आणि इंग्लंडचा कर्णधार जोस बटलर यांना ताफ्यात समाविष्ट केलं. यासह आता आयपीएल २०२५ साठी गुजरात जायंट्सचा संपूर्ण संघ कसा आहे?**




गुजरात जायंट्स संघाचे प्रशिक्षक पद भारताचा अनुभवी गोलंदाज आशिष नेहराकडे आहे. तर गुजरातच्या संघाने आयपीएल २०२५ च्या महालिलावापूर्वी कर्णधार शुबमन गिल, रशीद खान, राहुल तेवतिया, शाहरूख खान आणि युवा फलंदाज साई सुदर्शन या ५ खेळाडूंना संघाने रिटेन केलं होतं आणि त्यानंतर गुजरातने लिलावात चांगली गोलंदाजी फळी तयार केली. सामने आणि जेतेपद पटकावयचं असेल तर गोलंदाजांची मजबूत फळी असायला हवी यावर प्रशिक्षक आशिष नेहरा यांचा भर असतो. याचाच भाग म्हणून त्यांनी मोहम्मद सिराज, प्रसिध कृष्णा यांना संघात घेतलं. या दोघांसाठी गुजरातला मोठी रक्कम मोजावी लागली. महिपाल लोमरोर, कुमार कुशाग्र, निशांत सिंधू, अनुज रावत आणि मानव सुतार या युवा खेळाडूंचा संचच गुजरातने खरेदी केली.शुबमन गिल (कर्णधार), रशीद खान, साई सुदर्शन, राहुल तेवतिया, शाहरुख खान, जोस बटलर, मोहम्मद सिराज, कागिसो रबाडा, प्रसिध कृष्णा, वॉशिंग्टन सुंदर, शेरफेन रदरफोर्ड, जेराल्ड कोएत्झी, आर साई किशोर, महिपाल लोमरोर, गुरनूर सिंग ब्रार, मोहम्मद खान, अरविंद खान, इशांत शर्मा, कुमार कुशाग्र, मानव सुथार, अनुज रावत, मानव सिंधू, जयंत यादव, ग्लेन फिलिप्स, कुलवंत खेजुरालिया. गुजरात जायंट्स संघाचे प्रशिक्षक पद भारताचा अनुभवी गोलंदाज आशिष नेहराकडे आहे. तर गुजरातच्या संघाने आयपीएल २०२५ च्या महालिलावापूर्वी कर्णधार शुबमन गिल, रशीद खान, राहुल तेवतिया, शाहरूख खान आणि युवा फलंदाज साई सुदर्शन या ५ खेळाडूंना संघाने रिटेन केलं सामने आणि जेतेपद पटकावयचं असेल तर गोलंदाजांची मजबूत फळी असायला हवी यावर प्रशिक्षक आशिष नेहरा यांचा भर असतो.

### आयपीएल 2025 चे वेळापत्रक

२५ मार्च – गुजरात जायंट्स वि. पंजाब किंग्स
२९ मार्च – गुजरात जायंट्स वि. मुंबई इंडियन्स<BR>२ एप्रिल – रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू वि. गुजरात जायंट्स
६ एप्रिल – सनरायझर्स हैदराबाद वि. गुजरात जायंट्स
९ एप्रिल – गुजरात जायंट्स वि. राजस्थान रॉयल्स
१२ एप्रिल – लखनौ सुपर जायंट्स वि. गुजरात जायंट्स
१९ एप्रिल – गुजरात जायंट्स वि. दिल्ली कॅपिटल्स
२१ एप्रिल – कोलकाता नाईट रायडर्स वि. गुजरात जायंट्स
२६ एप्रिल – राजस्थान रॉयल्स वि. गुजरात जायंट्स
२ मे – गुजरात जायंट्स वि. सनरायझर्स हैदराबाद
६ मे – मुंबई इंडियन्स वि. गुजरात जायंट्स
११ मे – दिल्ली कॅपिटल्स वि. गुजरात जायंट्स
१४ मे – गुजरात जायंट्स वि. लखनौ सुपर जायंट्स
१८ मे – गुजरात जायंट्स वि. चेन्नई सुपर किंग्स

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। बुधवार ।
। दि. 19 मार्च 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# रुग्णांच्या अर्थसहाय्यासाठी आमदार लांडगे सरसावले!

## महापालिका चॅरिटेबल ट्रस्टची आर्थिक मदत देण्याची सूचना

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून गोरगरिब रुग्णांना मिळणारी 5 हजार रुपयांची आर्थिक मदत बंद झाली आहे. सदर अर्थसहाय्य महापौरांच्या स्वाक्षरीने देण्यात येते. मात्र, आता महापौर नाहीत, तर आयुक्तांच्या स्वाक्षरीने अर्थसहाय्य करावे, अशी सूचना भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**



> “पिंपरी-चिंचवड महानगरपालिका चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून गोरगरिब रुग्णांना आर्थिक मदत मिळण्याचा उपक्रम अविरत सुरू रहावा. त्यासाठी महापालिका अधिनियमातील संबंधित अटी-शर्तीच्या आधारे नवीन महापौर नियुक्त होईपर्यंत आयुक्त तथा प्रशासक म्हणून आपल्या स्वाक्षरीने किंवा अतिरिक्त आयुक्तांच्या स्वाक्षरीने रुग्णांना आर्थिक मदत मिळण्यासाठी सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी प्रशासनाला केली आहे. त्या दृष्टीने कार्यवाही होईल, अशी अपेक्षा आहे.
>
> – महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

**महापौर अभावी रुग्णांसह नातेवाईकांना अर्थसहाय्य मिळेना**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना याबाबत पत्र पाठवले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, शहरातील सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकर रुग्णांना आर्थिक मदत व्हावी. या उद्देशाने दि. 4 सप्टेंबर 1991 रोजी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना करण्यात आली आहे. याद्वारे वैद्यकीय मदतीसोबतच नैसर्गिक आपत्ती, मानवनिर्मित आपत्तीमध्ये गोरगरिबांना मदत करण्याचे धोरण आहे.

सदर चॅरिटेबल ट्रस्टसाठी महापौर यांची पदसिद्ध अध्यक्ष म्हणून नियुक्त होत असते. मात्र, मार्च- 2022 मध्ये महानगरपालिकेची मुदत संपली आहे. ओबीसी आरक्षण, प्रभाग रचना यामुळे निवडणुका पुढे गेल्या आहे. परिणामी, महापालिकेत प्रशासकीय राजवट सुरू आहे.

“महापौर” अभावी गरीब व गरजू रुग्णांना वैद्यकीय उपचारासाठी 5 हजार रुपये आर्थिक मदत मिळत नाही. मदतीच्या धनादेशावर महापौरांची स्वाक्षरी लागते. गेल्या तीन वर्षांपासून महापौर दालनाला टाळे आहेत. तसेच, महानगरपालिकेच्या जानेवारी-2022 मध्ये झालेल्या सर्वसाधारण सभेत आर्थिक मदतीची रक्कम 5 हजार रुपयांवरुन 15 हजार रुपयांवर करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. मात्र, सदर प्रस्तावावरही अद्याप कार्यवाही झालेली नाही. सदर प्रस्तावावर कार्यवाही करण्यात यावी, अशी सूचनाही आमदार लांडगे यांनी केली आहे.

## एसबीपीआयएम मध्ये “झिंग - 2025” चे आयोजन

# विद्यार्थ्यांच्या टॅलेंटची चढणार ‘झिंग’!

## शिक्षण विश्व: अभिनेते अनिल गवस आणि सई खलाटे यांची उपस्थिती

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।


**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (एसबीपीआयएम) येथे “झिंग २०२५” हा सांस्कृतिक कार्यक्रम, विविध बौद्धिक स्पर्धा आणि वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे.**




याचे उद्घाटन प्रसंगी गुरुवारी (दि.२०) “मिसेस इंडिया २०२४” या फॅशन शोमध्ये प्रथम रणर अप झालेल्या सई खलाटे आणि शनिवारी (दि. २२) वार्षिक पारितोषिक वितरण समारंभास चित्रपट अभिनेते अनिल गवस हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होणार आहेत. एसबीपीआयएम व्यवस्थापन कौशल्य व संशोधनाला प्रोत्साहन देणारी राष्ट्रीय स्तरावर मान्यता प्राप्त व्यवस्थापन संस्था आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा दृष्टिकोन समोर ठेवून, झिंग या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना व्यावसायिक, उद्योजक आणि सामाजिक जबाबदारीचे भान रुजवणे, त्यांना व्यवस्थापन आणि संशोधन करण्यासाठी प्रोत्साहन देणे अशा बौद्धिक स्पर्धा यावेळी घेण्यात येणार आहेत.

“झिंग २०२५” मध्ये आयपीएल ऑक्शन, ट्रेजर हंट, ग्रुप डान्स, सोलो डान्स, मनोलोग कॉम्पिटिशन, बिझनेस कॉम्पिटिशन, मिस्टर इंडिया व मिस्टर इंडिया डे अशा विविध मॅनेजमेंट गेम्स होणार आहेत, अशी माहिती संस्थेच्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर यांनी प्रसिद्धीस दिली आहे. डॉ. प्रणिता बुरबुरे, डॉ. हिना मुलानी या कार्यक्रमाच्या समन्वयक आहेत. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विद्यार्थ्यांना या कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिलेल्या आहेत.


मोरया शिक्षण संस्था
Computer Vacation Batch
ADMISSIONS OPEN
2025-26
'C' भाषा
₹ १३००/-
'C++' भाषा
₹ १३००/-
बेसिक जावा
₹ १३००/-
स्क्रॅच ॲनिमेशन
₹ १३००/-
बेसिक टॅली
₹ १५००/-
एम.एस. ऑफिस
₹ १५००/-
कोरल ड्रॉ
₹ ११००/-
Adobe AB फोटोशॉप
₹ ११००/-
सर्व कोर्स 20 मार्च 2025 पासून सुरू होत आहेत. इच्छुक पालक, विद्यार्थी व इतर शाळेतील विद्यार्थ्यांनी खालील नंबरवर संपर्क करून प्रवेश निश्चित करावा. अथवा शाळेतील संगणक कक्षात येऊन अधिक माहिती घ्यावी.
ठिकाण: संगणक लॅब, व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड. संपर्क : 8087706100


HOLISTIC LEARNING
Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
PRIYADARSHANI SCHOOL, ALANDI
42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION
50 FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS
86687 55826 / 98232 31705
Priyadarshani School, Alandi Rd, Thakur Vasti, Pune, Maharashtra 412105


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
7
STAR
RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com